नगरसचिव कार्यालय

पुणे महानगरपालिका

स्थायी समितीचा ठराव

सभा क्रमांक :- २२ दिनांक - ६/६/२०१७

विषय क्रमांक :- १७६ त्वर्य ठराव क्रमांक :- १८१ खाते :- मा.महा.आयुक्त

संदर्भ:-१) डॉ.डी.वाय.पाटील डेंटल स्कूल यांचे दि.२०/४/२०१७ रोजीचे पत्र.

२) मा. स्थायी समिती ठराव क्र. १२०० दि.२५/१०/२०११

३) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/७४ दि. ५/६/२०१७ चे पत्र.

---

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

डॉ.डी.वाय.पाटील ही संस्था पुरवित असणारी सेवा सुविधेचा लाभ स्थानिक गरीब व गरजू रुग्णांना होत आहे. तरी संदर्भ क्र. २ अन्वये मा. स्थायी समिती ठराव क्र. १२०० दि.२५/१०/२०११ या ठरावास पुढील पाच वर्षाकरीता मुदत वाढवून देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

आरोग्य अधिकारी

महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका
- 4 AUG 2017

Dr. Wavare

सहाय्यक आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका

आरोग्य कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र. एच.आय ९/७९२
दिनांक: ५/८/२०१७

पुणे महानगरपालिकेचे भारतरत्न स्व. राजीव गांधी रुग्णालय पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील डेंटल स्कूल, चऱ्होली, बुद्रुक याना पाच वर्षाचे कालावधीकरिता मेडिकल ट्रैनिंगसाठी व इतर पॅरामेडिकल कोर्सेससाठी उपलब्द करून देणेबाबत करारनामा.

आरोग्य कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक
दिनांक :

मा. महापालिका आयुक्त ,
पुणे महानगरपालिका.

यांच्याकडेस सविनय सादर........

**विषय :-** भारतरत्न स्व . राजीव गांधी रुग्णालय , येरवडा हे डी वाय पाटील डेंटल स्कूल, चऱ्होली , बुद्रुक याना मेडिकल ट्रैनिंगसाठी व इतर पॅरामेडिकल कोर्सेससाठी उपलब्ध करून देणेबाबत .

**संधर्भ :-** डी वाय पाटील डेंटल स्कूल यांचा जा. क्र. :- दि. :- चा अर्ज

**महोदय,**

पुणे महानगरपालिके तर्फे येरवडा येथे ३० बेड्सचे पेस्तनजी प्रसूतिगृह व बाहयरुग्ण विभाग कार्यरत होता. पुणे महानगरपालिकेने सादर जुनी इमारत पाडून त्ययाठिकाणी परिपूर्ण वैद्यक्रीय सेवा देणेसाठी सर्वसाधारण सर्वोपचारी रुग्णालय सुरु करण्याचे उद्धयेशाने विविध विभागासह १८० बेड्सचे सर्वसाधारण रुग्णालय पूर्ण क्षमतेने चालेल अशी इमारत व रेसिडेंट कॉर्टर्स पाच वर्षापूर्वीच बांधलेली आहे. सादर इमारत त्यातील इन्फ्रास्ट्रक्चर, लिफ्ट, सुसज्य ऑपरेशन थिएटर बाहयरुग्ण विभाग रेसिडेंट कॉर्टर्स वगैरेसह बांधून तयार आहे.

सदर इमारतीत सध्या फक्त प्रसूतिगृह विभाग व बाहयरुग्ण विभाग आणि कुटुंब कल्याण विभाग कार्यरत आहेत. पुणे मनपाला असे रुग्णालय चालविण्याचा पुरेसा पूर्वानुभव नसल्याने सदर रुग्णालय बीओटी अगर संयुक्त प्रकल्प तत्वाने चालविण्याचा मनपाचा विचार होता. परंतु सादर बाबीस मा. नगरसेवक, मा . स्थानिक आमदार व विविध सामाजिक संस्थांनी तीव्र विरोध केला. सदर रुग्णालय हे पुणे मनपाने स्वतः चालवावे अशी वेळोवेळी मागणी केलेली आहे.

याबाबत मा.विधानसभेत तारांकित प्रश्न देखील उपस्थित केला आहे व मा. विधानसभेमध्ये महाराष्ट्र शासनाकडून पुणे मनपा सादर रुग्णालय स्वतः चालवेल असे आश्वासन दिले आहे. सदर रुग्णालय पुणे मनपातर्फे पूर्ण क्षमतेने चालविणेसाठी वर उल्लेख केल्या प्रमाणे सर्व तयारी झालेली आहे.

परंतु सदर रुग्णालय पूर्ण क्षमतेने चालविण्यासाठी विविध विभागासाठी लागणारा पॅरामेडिकल स्टाफ व विविध विषयांचे तज्ञ डॉक्टर्स उपलब्ध होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यांचे शिवाय सदर रुग्णालय सुरु होऊ शकत नाही.

संबंधित स्टाफचे भरती करणेसाठी आरोग्य खात्यामार्फत वेळा जाहिरात दिली गेली आहे. परंतु दोन्ही वेळा तज्ञ डॉक्टर्स व पॅरामेडिकल स्टाफ आरोग्य खात्याला उपलब्ध झालेला नाही.

पुणे मनपाकडून सुसज्ज सर्वसाधारण सर्वोपचार रुग्णालय चालू करणेसाठी सर्व व्यवस्था झालेली आहे. परंतु विविध विषयाचे तज्ञ डॉक्टर्स व पॅरामेडिकल स्टाफ प्रयत्न करूनही उपलब्द होत नसल्याने आपण रुग्णालय सुरु करू शकलेलो नाही. सदर विविध विषयाचे तज्ञ डॉक्टर्स व पॅरामेडिकल स्टाफ उपलब्ध झाल्यास रुग्णालय पूर्ण क्षमतेने चालवू शकतो.

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA © 2016 © AB 413764

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासुन ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे.

अनु.क्र. १८९५२ दि. १८।९।१७ मु.रक्कम ५००/-

दस्ताचा प्रकार ॲग्रीमेंट

दस्त नोंदणी करणार आहेत का ? होय/नाही.

मिळकतीचे वर्णन

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव डॉ. आनंद [illegible] शिंगाडी

पत्ता लोहगांव - पुणे ४७

दुसऱ्या पक्षकाराचे नांव

हस्ते व्यक्तीचे नांव व पत्ता दिपक कोळकर - पुणे ४०

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही

उषा अंधारे
स्टॅम्प व्हेंडर
परवाना क्र. 2201092
शिवाजीनगर, पुणे - १६.

आरोग्य कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक
दिनांक :

मा. महापालिका आयुक्त ,
पुणे महानगरपालिका.

यांच्याकडेस सविनय सादर.......

**विषय :-** भारतरत्न स्व. राजीव गांधी रुग्णालय , येरवडा हे डी वाय पाटील डेंटल स्कूल, चऱ्होली , बुद्रुक याना मेडिकल ट्रैनिंगसाठी व इतर पॅरामेडिकल कोर्सेससाठी उपलब्ध करून देणेबाबत .

**संधर्भ :-** डी वाय पाटील डेंटल स्कूल यांचा जा. क्र. :- दि. :- चा अर्ज

**महोदय,**

पुणे महानगरपालिके तर्फे येरवडा येथे ३० बेड्सचे पेस्तनजी प्रसूतिगृह व बाहयरुग्ण विभाग कार्यरत होता. पुणे महानगरपालिकेने सादर जुनी इमारत पाडून त्याठिकाणी परिपूर्ण वैद्यकीय सेवा देणेसाठी सर्वसाधारण सर्वोपचारी

डी वाय पाटील पाटील डेंटल स्कूल तज्ञ डॉक्टर्स आणि पॅरामेडिकल स्टाफ देणेस तयार आहे. याकरिता त्यांना रु. १ कोटी २५ लाख रुपये एकाचवेळी खर्च करणे अपेक्षित आहे. तसेच दरमहा साधारणपणे रु. १५,६१.८०० /- प्रमाणे दर वर्षी रु. १,८७,४१,६०० /- खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च करण्यास स्वीकृती दिलेली आहे. सदर बाबी उपलब्ध झाल्यास भारतरत्न स्व. राजीव गांधी प्रसूतिगृह येरवडा पूर्ण क्षमतेने आपण चालवू शकतो.

तरी सदर रुग्णालय डी वाय पाटील पाटील डेंटल स्कूल, चऱ्होली बुद्रुक याना वैद्यकीय विद्यार्थ्यांचे मेडिकल ट्रैनिंगसाठी व इतर पॅरामेडिकल कोर्सेससाठी खालील अटी शर्तीसह उपलब्ध करून द्यावे असा आरोग्य प्रस्ताव आहे.

**अटी व शर्ती .**

१ ) डी वाय पाटील डेंटल स्कूलने अर्जामध्ये मान्यकेलेल्या विविध सुविधां, तज्ञ डॉक्टर्स व पॅरामेडिकल स्टाफ यांची आर्थिक भार जबाबदारी त्यांची राहील. याबाबत पुणे मनपास कुठलीही आर्थिक तोशिष पडणारनाही.

२) सदर रुग्णालयात काम करणारा सर्व कर्म चारी वर्ग तसेच डी. वाय. पाटील डेंटल स्कूलने देऊकेलेला कर्मचारी वर्ग हे मा. इनचार्ज भारतरत्न स्व. राजीव गांधी रुग्णलाय, येरवडा, व आरोग्य प्रमुख, पुणे मनपा यांचे नियंत्रणाखाली राहील.

३) सहा. आरोग्य प्रमुख, मेडिकल युनिट हे लायझन ऑफिसर राहतील.

४) डी वाय. पाटील डेंटल स्कूल चऱ्होली, बु. यांचे विद्यार्थ्यांना मेडिकल ट्रैनिंगसाठी व इतर पॅरामेडिकल कोर्सेसाठी सदर रुग्णालय उपलब्ध करून देण्यात येईल.

५) पुणे मनपाचे नवीन वैद्यकीय महाविद्यालय सुरूझाल्यावर पुणे मनपाच्या वैद्यकीय विध्यार्थांना हे रुग्णालय वैद्यकीय शिक्षणासाठी उपलब्ध राहील त्यास डी.वाय. पाटील. डेंटल स्कूल यांची हरकत असणार नाही.

६) डी वाय पाटील डेंटल स्कूल चऱ्होली, बु. यांना मनपा सोबत योग्य तो करारनामा करणे बंधनकारक आहे.

७) डी.वाय. पाटील डेंटल स्कूल चऱ्होली, बु. यांना सेवा देणे ( मेडिकल ट्रैनिंग व इतर पॅरामेडिकल कोर्सेस ) बंद करावयाचे असल्यास तशी पुणे मनपास तीन महिने अगोदर नोटीस द्यावी लागेल.

सदर करारातील कुठल्याही बाबतीत अंतिम निर्णय मा. महापालिका आयुक्त यांचा राहील. कराराप्रमाणे संबंधित पार्टीकडून वर्तन होत नसल्याचे पुणे मनपाचे मत झाल्यास तीन महिन्याची नोटीस देऊन मा. महापालिका आयुक्त सदर करारनामा रद्द करतील. मा. महापालिका आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील.

तरी उपरोक्त प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी व त्याकरिता मा. स्थायी समितीचे मान्यते करिता सादर करावयाचे सोबतच्या विषयपत्रावर स्वाक्षरी होणेस विनंती आहे.

मा. स. कळावे.

कारणे लिहून देणार करारनामा लिहून देतो ऐसे जे ...

अ) पुणे महानगरपालिकेतर्फे येरवडा ३० बेड्सचे पेस्तनजी प्रसूतीग्रह व बाहयरुग्ण विभाग कार्यरत होता. पुणे मनपाने सदर जुनी इमारत पाडून त्याठिकाणी परिपूर्ण वैद्यकीय सेवा देणेसाठी सर्वसाधारण सर्वोपचारी रुग्णालय सुरु करण्याचे उद्येशेने विविध विभागांसह सर्वसाधारण रुग्णालय पूर्ण क्षमतेने चालेल अशी इमारत रेसिडेंट कॉर्टससह पाच वर्षापूर्वी बांधलेली असून सदर इमारतीत प्रसुतिगृह विभाग व बाहयरुग्ण विभाग आणि कुटुंब कल्याण विभाग कार्यरत आहेत. सदर रुग्णालयाचा विस्तार करून त्यात दंत चिकित्सा विभाग सुरु करण्याचे लिहून घेणार यांनी ठरविले आहे.

भारतरत्न स्व. राजीव गांधी रुग्णालय येथे पदमश्री डी. वाय. पाटील स्कूल चऱ्होली, बुद्रुक हे विविध सुविधा व तज्ज्ञ डॉक्टर्स आणि पॅरामेडिकल स्टाफ देणेस तयार असल्याचे पत्र लिहून देणार यांनी दि. ....... रोजी लिहून घेणार यांना दिले व सदर दंत चिकित्सा विभागाची सोय .लिहून देणार यांचे विद्यार्थ्यांना उपलब्द करून देण्याची विनंती केली. त्यास अनुसरून भारतरत्न स्व. राजीव गांधी रुग्णालय, येरवडा हे डी. वाय. पाटील डेंटल स्कूल, चऱ्होली बुद्रुक यांना सदर करारनाम्याचे दिनांकापासून पाच वर्षेचे कालावधीकरिता मेडिकल ट्रैनिंगसाठी व इतर पॅरामेडिकल कोर्सेससाठी उपलब्द करून देणेबाबत मा. स्थायी समिती ठराव क्र. ........दि. .................. अन्वये मान्यता देण्यात आली असून खालील अटी व शर्ती अधीन राहून करारनामा करण्यात येत आहे.

ब) प्रस्तुत करारनाम्याचा अटी व शर्ती खालील प्रमाणे:

१) डी. वाय. पाटील डेंटल स्कूलने सदर प्रस्तावामध्ये नमूद केल्याप्रमाणे २ रुग्णवाहिका, डेंटल युनिट, रेडिओलॉजि विभाग, अपग्रेडींग पॅथॉलॉजिकल लॅबोरेटरी सक्षम तसेच तज्ञ व पॅरामेडिकल स्टाफ यांची आर्थिक जबाबदारी डी. वाय. पाटील डेंटल स्कूल यांचा राहील. पुणे मनापास कुठलीही आर्थिक तोषिश पडणार नाही.

२) डी वाय पाटील डेंटल स्कूलने त्यांचे दि. ०४/०८/२०११ चे मूळ प्रस्तावामध्ये नमूद केल्याप्रमाणे खालील प्रमाणे तज्ञ डॉक्टरांची सेवा पुरविणे आवश्यक आहे.

दंत महाविद्यालयासाठी लागणार शिक्षक वर्ग खालील प्रमाणे

| Sr. No. | Department | Requirement |
|---|---|---|
| 1. | Gen. Medicine | 2 Lecturers |
| 2. | Gen. Surgery | 2 Lecturers |
| 3. | Anaesthesiology | 1 Lecturer |
| 4. | Dentist with supporting staff | 1 Dentist |

वर नमूद केलेला डेंटल स्टाफ दंत महाविद्यालयासाठी पुरेसा आहे. तरी हि रुग्णांनाच्या सोई करिता व जन सेवेकरिता खालील अतिरिक्त स्टाफ लवकरात लवकर नियुक्त करू.

| Sr. No. | Department | Requirement |
|---|---|---|
| 5. | Radiology | 1 Lecturer |
| 6. | Pathology | 1 Lecturer |
| 7. | Pathology Technician | 1 Technician |
| 8. | One Ambulances | 1 |

One time investments:

Dental Clinic

X-ray Unit

OPD expenses

३) सदर नमूद करणेत आलेला सर्व कर्मचारी वर्ग तसेच डी. वाय. पाटील डेंटल स्कूलने देऊ केलेला कर्मचारी वर्ग स्व. भारतरत्न राजीव गांधी रुग्णालय, येरवडा व आरोग्य प्रमुख, पुणे मनपा यांचे नियंत्रणाखाली राहील.

४) सहा. आरोग्य प्रमुख, मेडिकल युनिट आरोग्य खाते, पुणे महानगरपालिका हे लायझन ऑफिसर राहतील.

५) डी. वाय. पाटील डेंटल स्कूल चऱ्होली, बुद्रुक यांचे विद्यार्थ्यांना मेडिकल ट्रैनिंगसाठी व इतर पॅरामेडिकल कोर्सेससाठी सदर रुग्णालय उपलब्ध करुन देण्यात येईल.

६) डी. वाय. पाटील स्कूल त्यांचे तज्ज्ञ अधिकारी, पॅरामेडिकल स्टाफ अथवा विद्यार्थ्यांकडून रुग्णांना कोणत्याही प्रकारची दुखापत झाल्यास अथवा कोणतीही अप्रिय घटना घडल्यास अथवा कोणत्याही प्रकारचा अपघात घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी डी. वय. पाटील डेंटल स्कूल यांची असेल.

७) पुणे मनपाचे नवीन वैद्यकीय महाविद्यालय सुरु झाल्यावर पुणे मनपाचा वैद्यकीय विद्यार्थ्यांना हे रुग्णालय वैद्यकीय शिक्षणासाठी उपलब्द राहील त्यास डी. वाय. पाटील डेंटल स्कूल यांची हरकत असणार नाही.

८) डी. वाय. पाटील डेंटल स्कूल चऱ्होली, बुद्रुक यांना सेवा घेणे (मेडिकल ट्रैनिंग व इतर पॅरामेडिकल कोर्सेस) बंद करावयाचा असल्यास तशी पुणे मनापास तीन महिने अगोदर नोटीस द्यावी लागेल.

९) ५ वर्षाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर डी. वाय. पाटील स्कूल, चऱ्होली, बुद्रुक यांचे कामकाज समाधानकारक व म. न. पा. चे हिताचे आहे असे मा. महापालिका आयुक्त यांचे मत झाल्यास योग्य प्राधिकाऱ्याचे वतीने पुढील कालावधीसाठीचा निर्णय घेण्यात येईल.

१०) उपरोक्त संस्था पुणे म.न.पा ला प्रति विद्यार्थी प्रति ट्रैनिंग इयर करीता रु.४०००/- शुल्क अदा करेल. या बाबत बदल करण्याचा अधिकार मा. महापालिका आयुक्त याना राहील.

११) सदर करारातील कुठल्याही बाबतीत अंतिम निर्णय मा. महापालिका आयुक्त यांचा राहील. कराराप्रमाणे संबंधित पार्टीकडून वर्तन होत नसल्याचे पुणे मनपा चे मत झाल्यास एक महिन्याची नोटीस देऊन महानगरपालिका आयुक्त सदर करारनामा रद्द करतील. मा. महानगर पालिका आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील.

१२) पुणे मनपा चे स्थायी समिती मूळ ठराव क्र. ........., दि. ................मधील अटी लिहून घेणार व लिहून देणार यांचेवर बंधनकारक राहतील.

१३) सदर करारनाम्याचा स्टॅम्प इत्यादींचा खर्च लिहून देणार यांनी करावयाचा आहे.

१४) सदर रुग्णालयाच्या इमारतीमध्ये लिहून देणार डेंटल स्कूलच्या डॉक्टरांना, स्टाफला व विद्यार्थ्यांना जाण्या येण्याचा करारनाम्याच्या मुदती दरम्यान परवाना राहील.

१५) प्रस्तुत कराराचा अनुषंगाने कोणताही वाद उपस्थित झाल्यास पुणे येथील न्यायालयास कार्यकारिता राहील.

**साक्षीदार:**

१ ) नाव:- विनोद कृष्णा डेक्कस

पत्ता:- आकुसोडेल सदन, स.नं. ३, गायकवाड नगर, पिंपरी, पुणे ४११०१५.

स्वाक्षरी V. K. DOLAS

२) नाव :

पत्ता :

स्वाक्षरी :

**लिहून देणार :**

नाव : DILIP KAWAD

पत्ता : D Y PATIL KNOWLEDGE CITY, CHAROLI BUDRUK VIA LOHEGAON, PUNE 412105

स्वाक्षरी :

**लिहून घेणार:**

नाव : डॉ. अंजली साबणे

पत्ता: पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर पुणे ५

स्वाक्षरी : आरोग्य अधिकारी पुणे महानगरपालिका

प्रस्तुत करारावर आमचे समक्ष पुणे महानगरपालिकेचे सील लावले असे .....

D Y PATIL GROUP

# D Y PATIL DENTAL SCHOOL

Affiliated to the Maharashtra University of Health Sciences, Nashik
Recognized by Dental Council of India

## CERTIFICATE

Rajeev Gandhi Hospital, Yerwada, Pune has been temporarily converted to Pediatric Covid Hospital since March 2020.

To continue the Academic and Clinical experience of D Y Patil Dental School BDS Students, PMC has allotted Mhaske Hospital affiliated, Kalas,Vishranthwadi, Pune Municipal Corporation from 13th Oct 2021

DEAN
Dr Anand Shigli

D Y PATIL DENTAL SCHOOL PUNE

Dr D Y Patil Knowledge City, Charholi Bk, Via Lohegaon, Pune 412 105
Phone (020) 67077779 • Fax (020) 67072718 • E Mail : dean@dypds.com

28th, June, 2022

To

The Dean

DY Patil Dental School

Charholi, Pune

Sir

This is to certify that D Y Patil Dental was attached to Rajeev Gandhi Hospital, Yerwada, Pune.

As Per Pune Municipal Corporation's order no HO/8758 dated 13/10/2021, D Y Patil Dental School had shifted to temporarily at Gyanba Mhaske Hospital, Kalas Pune as the Pune Municipal Corporation's Rajeev Gandhi Hospital, Yerwada undergoing renovation for Pediatric Covid Hospital.

Now the said D Y Patil Dental School has been shifted back to Rajeev Gandhi Hospital, Yerwada on 27th June 2022 which please note.

Medical Officer

Gyanba Mhaske Hospital, Kalas

Pune Municipal Corporation